ePaper

## “2024 पर्यंत विरोधकांना तुरुंगात टाकण्याचं धोरण”: संजय राऊत




| वर्ष - 6 | अंक - 355 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दि. 15 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



**आतील पानांत**

- राज्याच्या सहकार क्षेत्रात अमित शहांचे दमदार पाऊल
- वाघेश्वर मंदिराला ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा
- पारसची शरण पत्रकारिता अन विझलेले सामाजिक नेतृत्व


# पिंपरी चौक अक्षरशः ‘भीममय!’

## हजारोंचा भीमसागर लोटला : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना



। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महामानवास अभिवादन करण्यासाठी शहरातील चौका चौकात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच बाबासाहेबांना आभिवादन करण्यासाठी येणाऱ्या प्रत्येकाने पांढऱ्या, निळया रंगाचे वस्त्र परिधान केले होते. त्यामुळे परिसर भीममय झाला होता.**

पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक हा शहरातील मुख्य चौक आहे. या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णकृती पुतळा आहे.(PIMPRI) तसेच या परिसरात महापालिकेच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. त्यामुळे शुक्रवारी संपूर्ण शहरातील आंबेडकरी अनुयायांनी पिंपरी चौकात हजेरी लावली. जयंती निमित्ताने पिंपरी चौकात हजारो नागरिक आभिवादनासाठी आले.

### नागरिकांची गर्दी अन् आनंदाचे वातावरण...

- पिंपरी चौकात बाबासाहेबाचे मोठया आवाजात डिजेवर भीम गीतांचा जलसा होता. चौक परिसरात मागच्या बाजुला देखील बाबासाहेबांवर विविध गीते सादर केली जात आहेत. त्यामुळे या ठिकाणी नागरिकांची मोठी गर्दी होती.
- आभिवादनासाठी आलेल्या नागरिकांसाठी पाणी, जेवण, सरबत देण्यात येत आहे. तसेच जयंती असल्यामुळे चौकातील परिसरात मोठी यात्रा भरली.
- या यात्रेमध्ये डॉ. बाबासाहेब यांच्या प्रतिमा, शिल्पे, बिल्ले तसेच निळया रंगांच्या झेंड्यांनी परिसरात आंनदाचे वातावरण होते.

# महामानव डॉ. आंबेडकर म्हणजे प्रज्ञासूर्य लोकनायक!

## आमदार महेश लांडगे यांच्या भावना : जयंतीदिनी डॉ. आंबेडकर यांना अभिवादन

। पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।



**समाजातील दिन-दुबळ्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा निर्धार यशस्वी करणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे प्रज्ञासूर्य लोकनायक आहेत. शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा... असा संदेश देणारे डॉ. आंबेडकर युगानुयुगे वंदनीय राहतील, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.**

पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीच्या वतीने मोरवाडी येथील मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीदिनी अभिवादन करण्यात आले. यावेळी विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, प्रदेश सचिव अमित गोरखे, दक्षिण भारतीय आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष सुभाष सरोदे, माजी नगरसेविका सुजाता पालांडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### जातीअंताच्या लढ्याला डॉ. आंबेडकरांमुळे दिशा...

आमदार लांडगे म्हणाले की, भारतातील वर्गलढ्याला आणि जातीअंताच्या लढ्याला आकार आणि दिशा देण्याचे भरीव काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. जागतिक पातळीवर शोषण मुक्ती आणि समतेसाठीच्या लढ्यांमध्येही बाबासाहेब आंबेडकर प्रेरणादायी ठरले आहेत. वर्ग, जात, धर्म, लिंग यांचा भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान अधिकार यासाठी आंबेडकरांनी काम केले होते. स्वातंत्र्योत्तर भारतात तत्कालीन अस्पृश्यांच्या स्वातंत्र्याला काहीच किंमत नसेल, तर त्यातून अधिक गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होतील. तसे होऊ नये यासाठी बाबासाहेबांनी सामाजिक सुधारणा आणि अस्पृश्यता निर्मूलन ही कार्ये करण्याला प्राधान्य दिले.

# राज्याच्या सहकार क्षेत्रात शहांचे दमदार पाऊल!

## 'पॅक्स'ची संख्या दुप्पट करणार, केंद्राकडून राज्यात सहकार विकास समित्यांची स्थापना

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी सहकार चळवळ तळागाळातील लोकांपर्यंत पोचविण्यासाठी प्राथमिक कृषी सहकारी संस्था सक्षम करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या अनुषंगाने केंद्र सरकारने राज्य आणि जिल्हास्तरावर सहकार विकास समित्यांची स्थापना केली आहे.**

या समित्यांवर प्राथमिक कृषी सहकारी संस्थांच्या सक्षमीकरणाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्यामुळे या समित्यांच्या माध्यमातून भाजप आता सहकार क्षेत्रात मजबूत पकड निर्माण करीत असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे.



केंद्र सरकारने सहकार चळवळीच्या बळकटीकरणासाठी बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्थांना (पॅक्स) सक्षम करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार ज्या गावात सहकारी संस्था अस्तित्वात नाहीत, तेथे नवीन बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था किंवा दुग्ध, मत्स्यव्यवसाय संस्था स्थापन करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिलेली आहे. त्याअनुषंगाने केंद्र सरकारने सर्व राज्यांमध्ये राज्य आणि जिल्हास्तरावर जिल्हा सहकार विकास समित्या स्थापन केल्या आहेत.

केंद्राच्या निर्णयानुसार देशात पुढील पाच वर्षांत दोन लाख नवीन बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था स्थापन करण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्हास्तरावर कृती आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. राष्ट्रीय सहकारी डेटाबेस तयार करणे, त्रिस्तरीय रचनेनुसार प्राथमिक कृषी सहकारी संस्थांचा जिल्हा आणि राज्य बँक यांच्याशी समन्वय राखून संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, तसेच केंद्राच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी या समित्यांवर असणार आहे. केंद्राच्या या निर्णयामुळे भाजप (BJP) राज्यातील सहकार क्षेत्रात आपला ठसा उमटविण्याच्या तयारीत असल्याचे दिसून येत आहे.

केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह (AMIT SHAH) यांच्या निर्णयानुसार महाराष्ट्रात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य सहकार विकास समिती स्थापन केली आहे.

या समितीच्या सदस्यपदी राज्य सहकारी बँकेचे प्रशासकीय अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांची नियुक्ती केलेली आहे. तसेच इतर सदस्यांमध्ये सहकार व पणन, कृषी, पशुसंवर्धन, महसूल, ग्रामविकास विभागाचे अतिरिक्त किंवा प्रधान सचिव, तसेच सहकार आयुक्त, नाबार्ड, राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ, मत्स्य विकास महामंडळाचे प्रतिनिधी असणार आहेत..

# बाजार समिती निवडणूक; पंधरा पैकी राष्ट्रवादीला 9, तर ठाकरे गटाला केवळ एकच जागा!



।कोथरूड । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेची निवडणूक तब्बल २० वर्षांनंतर होत आहे. या निवडणुकीत शुक्रवारी (ता.14) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि मित्रपक्ष पुरस्कृत अण्णासाहेब मगर सहकार पॅनेलने 15 पैकी 10 उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आली.

या दहा जागांमध्ये राष्ट्रवादीला नऊ आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला 1 जागा देण्यात आली आहे. राहिलेल्या 5 उमेदवारांची नावे शनिवारी (ता. 15) जाहीर करण्यात येणार आहेत. निवडणुकीसाठी 28 एप्रिलला मतदान होणार असून, 29 एप्रिल रोजी मतमोजणी होणार आहे.

विकास सोसायटीच्या 11 पैकी 7 जागांचे उमेदवार निश्चित करण्यात आलेले आहेत. सर्वसाधारण गट शेखर सहदेव म्हस्के (कळस), संतोष आबासाहेब कांचन (उरळी कांचन), अशोक सुदाम गायकवाड (कोलवडी), योगेश बाळासाहेब शितोळे (न्हावी सांडस) यांचा समावेश आहे. इतर मागासवर्गीय प्रवर्गातून सचिन बाळासाहेब घुले (उंड्री), महिला प्रवर्गातून सरला बाबुराव चांदेरे (बाणेर), विमुक्त जाती-भटक्या जमाती प्रवर्गातून अर्जून पिलाजी मदने (कोलवडी) यांना उमेदवारी देण्यात आलेली आहे. ग्रामपंचायत मतदार संघात चारपैकी तीन जागांवर उमेदवारी जाहीर झाली आहे. सर्वसाधारण गटातून महाराष्ट्र केसरी राहुल रामचंद्र काळभोर (लोणी काळभोर), ठाकरे गट शिवसेनेतून रामकृष्ण हेमचंद्र सातव (वाघोली) आणि आर्थिक दुर्बल प्रवर्गातून नवनाथ रोहिदास पारगे (डोणजे) यांना उमेदवारी देण्यात आली आहे.बाजार समिती राष्ट्रवादी आणि मित्र पक्षाच्या पॅनेलचे 10 उमेदवार जाहीर केले आहेत.

# जुनी सांगवी दापोडी परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

## सामाजिक संघटना, राजकीय पक्ष,कार्यकर्ते व समाज बांधवांकडून अभिवादन

।जुनी सांगवी। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**दापोडी जुनी सांगवी परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाने उत्साहात साजरी करण्यात आली. विविध सामाजिक संघटना, राजकीय पक्ष,कार्यकर्ते व समाज बांधवांकडून दापोडी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**

दापोडी येथील संदिप गायकवाड मित्र मंडळाच्या वतीने भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले.विविध मित्र मंडळांच्या वतीने सवाद्य मिरवणूकांचे आयोजन करण्यात आले होते.भारतीय बौद्धजन विकास समिती यांच्या वतीने त्रैलोक्य बौद्ध महासंघ परिक्षा मार्गदर्शन केंद्रापासून महिलांची भव्य दुचाकी रॅली काढण्यात आली होती.

सजवलेला रथ व पाचशे महिलांनी दुचाकीवरून डोक्यावर निळे फेटे, हातात निळे झेंडे घेवून या रॅलीत सहभागी झाल्या होत्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो,जय भिम च्या जयघोषात काढण्यात आलेल्या या महिलांच्या दुचाकी रॅलीचे ठिक ठिकाणी स्वागत करण्यात आले.दापोडी त्रैलोक्य बौद्ध महासंघ स्पर्धा परिक्षा केंद्र, येथून पुतळा परिसर ,जुनी सांगवी वसंतदादा पुतळा मार्ग,

चंद्रमणी नगर,एकता चौक पवार नगर या मार्गावर फिनिक्स सोशल ऑर्गनायझेशन व समाज बांधवांच्या वतीने पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले.येथील मधुबन मित्र मंडळ,सिझन सोशल ग्रुप,प्रशांत शितोळे मित्रपरिवार यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.



# वाघेश्वर मंदिराला ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा

## » आ. महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश : जिल्हा नियोजन समिती, पालकमंत्र्यांची मान्यता

।पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**चऱ्होली येथील पुरातन श्री वाघेश्वर मंदिराचा ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्र आणि पर्यटनस्थळ यादीत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे मंदिर परिसराच्या सुशोभिकरणासह विविध पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करण्यास चालना मिळणार आहे. तसेच, चऱ्होलीसह सभोवतालच्या भागाच्या विकासाला आणखी गती मिळणार आहे.**

भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत श्री वाघेश्वर मंदिराचा समावेश तीथक्षेत्र आणि पर्यटन यादीत करावा, अशी मागणी केली. त्याबाबत कागदोपत्री पाठपुरावा केला होता. त्याला यश मिळाले आहे.

दरम्यान, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सकारात्मक पुढाकार घेत जिल्हा नियोजन समितीच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. त्यामुळे मंदिर परिसरातील सौंदर्यीकरणाच्या दृष्टीकोतून बागबगीच्याची कामे हाती घेता येईल.

शासनाच्या विविध विभागामार्फत उपलब्ध होणाऱ्या निधीतून एसटी स्टँड, ग्रामीण रुग्णालय,विजेचा ट्रान्सफॉर्मर किंवा सब स्टेशन तसेच पोलीस चौकी बांधण्यासाठी देवस्थान ट्रस्टतर्फे पाठपुरावा करणे शक्य होणार आहे. देवस्थानला आपल्या हिश्याची रक्कम सेवाभावी संस्थेकडून किंवा दानशूर व्यक्ती कडून देणगी स्वरुपात घेण्यास मुभा राहणार आहे.



“ ग्रामीण आणि शहरी भागाचा विकासाचा सेतू निर्माण करीत २०१७ पासून चऱ्होलीतील विविध विकासकामे मार्गी लावण्यात आली. पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यात आल्या. ग्रामदैवत श्री. वाघेश्वर महाराज हे ग्रामस्थांसाठी श्रद्धास्थान आहे. ग्रामस्थांनी जीर्णोद्धारासह वृक्षारोपण आणि सुशोभिकरणासाठी एकोप्याने पुढाकार घेतला. आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून मंदिराला तीर्थक्षेत्र व पर्यटन स्थळाचा दर्जा मिळाला, ही बाब निश्चितच अभिमानाची आहे.

- नितीन काळजे, माजी महापौर.



“ भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावातील विकासाला प्राधान्य देण्याचा संकल्प आम्ही “भोसरी व्हीजन- २०२०” च्या माध्यमातून केला होता. मध्यंतरी कोविड महामारीमुळे किमान दोन वर्षे आणि राज्यातील सत्ता बदलामुळे अडीच वर्षे विकासकामांची गती संथ झाली होती. आता राज्यात शिंदे-फडणवीस सरकारची सत्ता आहे. त्यामुळे समाविष्ट गावांसह पिंपरी-चिंचवडशी संबंधित विविध प्रलंबित कामे आणि भविष्याचा विचार करुन अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लागत आहेत. - महेश लांडगे, शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा.



### भाविकांचे श्रद्धास्थान श्री वाघेश्वर महाराज...

» श्रावण महिन्यात चऱ्होली व चऱ्होली जवळ असणाऱ्या विविध गावातून मोठ्या संख्येने नागरिक आपल्या परिवारासह वाघेश्वराच्या दर्शनासाठी येत असतात. पुणे जिल्ह्यातील महानस्थळ म्हणून मंदिराला संबोधले जाते. दाभाडे घराण्यातील मूळ पुरुष बज पाटील याचा मुलगा सोमाजी यांचा मुलगा कृष्णाजी दाभाडे याने श्री वाघेश्वर महानस्थळ हे मंदिर बांधले आहे. इ.स.१७२५ मध्ये या मंदिराची उभारणी गावातील टेकडीवर झाली होती. आता मंदिराला ‘क’ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्यामुळे भाविकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच भारत एकसंघ!

## » अजित गव्हाणे : राष्ट्रवादीतर्फे जयंतीदिनी अभिवादन



।पिंपरी-चिंचवड।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**महामानवांच्या विचारातून उद्याचा समाज घडत असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानामुळे आपला संपूर्ण देश एकसंध राहिला आहे. हेच बाबासाहेबांचे आपल्या देशावर खूप मोठे उपकार आहेत, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केले.**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसच्या खराळवाडी येथील कार्यालयात आयोजित कार्यक्रमात गव्हाणे बोलत होते. तत्पूर्वी डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यास शहराध्यक्ष गव्हाणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.\

माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत, निकिता कदम, माजी नगरसेवक गोरक्ष लोखंडे, सामाजिक न्याय सेलचे अध्यक्ष संजय औसरमल, ओबीसी सेल अध्यक्ष विजय लोखंडे, देवेंद्र तायडे यांच्यासह पक्षाचे आजी-माजी पदाधिकारी, माजी नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी नगरसेवक गोरक्ष लोखंडे म्हणाले,डॉ. बाबासाहेबांच्या पाठीशी त्यांच्या पत्नी त्यागमुर्ती रमाबाई आंबेडकर या ठामपणे उभ्या होत्या म्हणूनच बाबासाहेब घडू शकले. त्यांचेही चळवळीत मोठे योगदान राहिले आहे.`

### राष्ट्रवादीतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन...

» राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने 11 ते 14 एप्रिल या कालावधीत महापुरुषांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. मागासवर्गीय वस्त्यांमध्ये संविधानाचा प्रचार आणि प्रसार करण्यात आला. गुरुवारी (दि. 13) विठ्ठलनगर, नेहरूनगर येथे ‘संविधान ओळख’ अभियान राबविण्यात आले.(PIMPRI) या अभियानाद्वारे बाबासाहेबांनी लिहिलेले संविधान सोप्या भाषेत समजावून सांगण्यात आले. तसेच संविधानाच्या संक्षिप्त स्वरुपातील प्रतींचे वाटप करण्यात आले. याशिवाय शहरातील विविध वस्त्यांमध्ये पाच हजार संविधानाच्या प्रतींचे वाटप करण्यात आले.

## संपादकीय »

# सावरकर हा जगण्याचा मुद्दा?

***स्वातंत्र्यवीर सावरकरांविषयी सातत्याने गरळ ओकणाऱ्यांचा निषेध करण्यासाठी आणि सावरकरांचे विचार जनमानसात रुजवण्यासाठी भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेच्या वतीने ठिकठिकाणी सावरकर गौरव यात्रा काढण्यात येत आहे. सावरकरांनी आपले सारे आयुष्य भारतमातेच्या चरणी अर्पण केले आणि मुख्य म्हणजे मरणही याच देशासाठी पत्करले.***

वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी भारताला स्वतंत्र करण्याची शपथ त्यांनी घेतली आणि ती अखेरपर्यंत पाळली. वयाच्या ३० व्या वर्षी ५० वर्षे काळे पाणी अशी सर्वात मोठी शिक्षा झालेला हा जगातील एकमेव देशभक्त. असे हे स्वातंत्र्यवीर सावरकर सध्या राजकारण्यांच्या बेताल वक्तव्यामुळे पुन्हा एकदा गलिच्छ राजकारणाचा केंद्रबिंदू ठरत आहेत. खरंतर, राजकीय पक्षांच्या धुळवडीत आज सावरकर हा एक ‘मुद्दा’ बनला आहे, हे दुर्दैव. ‘भारत जोडो’ यात्रेदरम्यान या ‘मुद्याला’ उकळी फोडण्यात आली होती. त्यानंतर सातत्याने कुणीना-कुणी सावरकर या नावाचा वापर राजकारणासाठी पद्धतशीरपणे करून घेत आहे. कोणी सावरकरांविषयी आपल्याला किती आस्था आहे हे दाखवण्यासाठी त्यांची भलामन करत आहे, तर कुणी सावरकरांविषयी द्वेष पसरवण्यासाठी त्यांच्या नावाचा वापर करीत आहेत. सावरकरांनी इंग्रजांकडे माफीनामा दिला होता का? किंवा त्यांना इंग्रजांकडून मोठी पेंशन मिळत होती का याविषयी सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रश्नांची उत्तरे मिळाल्यावर सर्वसामान्यांच्या आयुष्यातील सर्वच समस्यांचे निराकरण होईल या पद्धतीने सध्या राजकारण तापवले जात आहे, पण या गदारोळात सर्वसामान्यांचे जे मूळ प्रश्न आहेत ते दुर्लक्षिले जाताहेत, त्याचे काय? आज महागाईने उच्चांक गाठला आहे. गॅस सिलिंडरचे भाव ११०० रुपयांच्या वर गेले आहेत. अवकाळी पावसामुळे ऐन उन्हाळ्यात शेकडो हेक्टरवरील रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. गहू, बाजरी, हरभरा, मका या पिकांसोबतच कांदा, भाजीपाल्याचेही मोठे नुकसान झाले आहे. द्राक्ष, आंब्याच्या बागाही आडव्या झाल्या आहेत. परिणामी बाजारात या पिकांची आवक घटल्याने सर्वसामान्यांना महागाईचे चटके बसायला सुरुवात झाली आहे. किरकोळ बाजारात चांगल्या दर्जाच्या गहू, ज्वारी, बाजरीने पन्नाशी ओलांडली आहे. उडीद डाळ, मूगडाळ, तूरडाळ यांनी होलसेल मार्केटमध्ये शंभरी पार केली आहे.महागाईच्या या रौद्रावताराने सर्वसामान्य मेटाकुटीस आला आहे.

# पारसची शरण पत्रकारिता अन विझलेले सामाजिक नेतृत्व






ज्या गावात,शहरात सतत प्रश्न पडणारी जनता,लोकांच्या प्रश्नांचे भान असणारे सामाजिक कार्यकर्ते आणि कितीही बड्या तीसमारखाला सवाल विचारण्याची निधडी छाती असणारे पत्रकार असतात तिथे फार गोंधळ करण्याची कुणाची हिंमत नसते.चुकीचे पाऊल उचलले तर कुणीतरी त्याचा जाब विचारेल याची भीती गावात कार्यरत घटकांना असते.सध्याच्या काळात कुठेही शिरून त्याची माहिती घेण्याचा अधिकार पत्रकारांना आहेच पण तो सामान्य नागरिक अन जागृत सामाजिक कार्यकर्त्यांना सुद्धा आहेच मात्र पत्रकार जिथे सहज घुसतात तिथे इतर घटक घुसण्याचे धाडस करीत नाहीत.या पृष्ठभूमीवर पारस मधील हे तिन्ही घटक कमालीचे निष्क्रिय आणि विझलेले आहेत असे आमचे ठाम मत बनले आहे.

पारस येथील बाबूजी महाराज संस्थान वर गेली अनेक वर्षे सुरू असलेल्या अघोरी उपचार करणाऱ्या " दुःख निवारण दरबार " आणि तिथे गर्दी करणाऱ्या लोकांपैकी सात भाविकांचा दुर्दैवी मृत्यू वर विविध अंगाने मांडणी केल्यावर या सगळ्या प्रक्रियेत अतिशय जबाबदार असणाऱ्या दोन प्रमुख घटकांची भूमिका तपासली पाहिजे . गावातील पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते हे ते दोन महत्वाचे घटक आहेत. पारस मधील संस्थानात झाड कोसळून लोक मृत्युमुखी पडले याची योग्य वेळेत बातमी देणे आणि वस्तुस्थिती वाचकांना बातमीच्या माध्यमातून सांगणे हे पत्रकारांचे काम असते. मात्र या घटनेत पारस मधील पत्रकारिता आपल्या कर्तव्याला पारखी झाल्याचे जाणवले.

पारस येथील पत्रकारिता आलटून पालटून दोन व्यक्तींच्या भोवती फिरत असते,ते म्हणजे सुरेश नागापुरे आणि साधुबुवा उर्फ राजू लांडे यांच्या भोवती.सगळ्या प्रमुख दैनिकांच्या पार्सल अन बतमीदारकी आपल्याच जवळ असली पाहिजे यावर कटाक्ष ठेवणारे हे पत्रकार आहेत.ज्या बाबूजी महाराज संस्थानवर वृत्तपत्रात अनेक लेख लिहिले,जाहिरात पुरवण्या काढल्या त्या सुरेश नागापुरे यांना या संस्थान विषयी काहीही माहिती किंवा सामान्य ज्ञान असू नये याचे नवल वाटते.हे संस्थान नोंदणी झाले आहे काय ? किती विश्वस्त आहेत ? तिथे कोणाच्या निधीतून किती कामे झाली ? संस्थानने ऑडिट रिपोर्ट सादर केला का ? या प्रश्नांवर माहीत नाही असे उत्तर देणारे नागापुरे या गावातील ज्येष्ठ पत्रकार आहेत.

नागापुरे गावात करीत असलेली पत्रकारिता " कातडी बचाव और तालुकात बढाव" टाइप असली तरी पत्रकाराने स्वार्थ साधूनही स्वतःचा दरारा कायम ठेवला पाहिजे.वाईट काम करणारी व्यक्ती कितीही मोठी असली तरी तिने दबकून राहायला हवे असा लौकिक निर्माण होणे पत्रकारांच्या वागणुकीवर असते इथे तसे काहीही होताना दिसत नाही.आपल्या गावाचे दैवत असणाऱ्या मंदिराचे व्यवसथापन,उत्पन्न, नियोजन, त्यांचे सार्वजनिक उपक्रम हे माहीत करून घेणे आणि लोकांना त्याची माहिती देणे हीच पत्रकारिता इथे होत नसेल तर कर्तव्यात कसूर करण्यात ही मंडळी मागे नाहीत असे म्हणावे लागेल.

दुसरे प्रमुख पत्रकार साधुबुवा उर्फ राजू लांडे, " रामनाम जपना,पराया माल अपना " हे गाणे त्यांच्यावर फिट बसते असे लोक म्हणतात .पत्रकारिता नेमकी कशाशी खातात याचे फारसे सोयरसुतक नसणाऱ्या या बुवांनी अनेकांची जाहिरात, वितरण बिले बाकी ठेवून गावाच्या जवळ आश्रम उभारणी सुरू करून निवृत्ती नंतरची तजवीज करून ठेवली आहे. हे ज्या वारकरी संप्रदायाचे नाते सांगतात त्यात अंगात येणे,अघोरी उपचार किंवा बुवाबाजीला अजिबात थारा नाही मात्र यावर राजूबाबा एकही अक्षर लिहायला,बोलायला तयार नाहीत." तुम्हीही कमवा अन मला टोकू नका" असा नवा फंडा पारस मधील पत्रकारितेत यांनी काढला आहे.कोणत्याही प्रश्नावर भूमिका न घेणे हा पारस पत्रकारितेचा स्थायीभाव बनला असेल तर नव्या पिढया कोणता आदर्श घेतील ?

# केंद्र-राज्याच्या धरसोडीमुळे कांद्याचा वांदा!

**एकेकाळी कांदा हे महाराष्ट्रातील हुकमी पीक होते. महाराष्ट्र सर्व देशाला कांदा पुरवायचा व निर्यातही करायचा व त्या निर्यातीत महाराष्ट्राचाच मुख्य वाटा होता. पुढे कांदा पिकाला बम्पर लॉटरीचे स्वरूप आले अन् अनेक इतर राज्यांमध्ये कांद्याचे पीक घेतले जाऊ लागले व बाजारपेठेतील महाराष्ट्राची मक्तेदारी संपली. दिल्लीच्या आझादपूर मांडीत आता अनेक राज्यांतून आलेला कांदा खाली होताना पाहायला मिळतो. यामुळे महाराष्ट्राला स्पर्धक तयार झाले हे खरे, पण कांद्याच्या समस्येचे कारण ही स्पर्धा नाही तर सरकारचे धोरण आहे.**

दरवर्षीप्रमाणे यंदाही कांद्याने शेतकऱ्यांना रडवले. सर्व बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांच्या कांद्याला लिलावात सरासरी ३० रुपये प्रतिकिलो भाव अपेक्षित होता. तो मिळालाच नाही. खरेदीबाबत अडवणुकीचे धोरण घेऊन भाव पाडण्यात आले. खरेतर सप्टेंबर महिना आला की वर्षाच्या या कालखंडामध्ये कांद्याचे दर वाढण्यास सुरुवात होते. यावर्षी तसे काही झाले नाही. अपेक्षित वाढ होण्याची शक्यताही धूसर होत गेली. आता साठवण्याची मर्यादा संपत आली. कांदा उत्पादक भाववाढीची वाट पाहत चाळीभोवती चकरा मारत होते.

एका डोळ्यात स्वप्न तर दुसऱ्या डोळ्यात काळजी होती. व्हायचा तोच परिणाम झाला. ५ ते ६ रुपये प्रतिकिलोने कांदा विकावा लागला. ठिकठिकाणी शेतकरी आंदोलन करू लागले. परिणामी



महाराष्ट्र राज्य सरकारकडे ६०० रुपये प्रतिक्विंटल अनुदानाची मागणी जोर धरू लागली. नाईलाजाने का होईना महाराष्ट्र सरकारने सुरुवातीला ३०० रुपये अनुदान जाहीर केले. पुढे माकपच्या लाँग मार्च दबावामुळे अजून ५० रुपयांची वाढ करून बोळवण केली गेली, परंतु आता दुसरे काद्याचे पीक बाजारात येऊ लागले आहे, ज्याला उन्हाळ किंवा गावठी कांदा म्हटले जाते. आजमितीस उन्हाळ कांद्याचा भावसुद्धा ८०० ते १००० रुपये प्रतिक्विंटल आहे.अजून लाखो टन कांदा बाजारात येईल, अशी जाणकारांची माहिती आहे. असो, कांदा ही समस्या काय आहे हे पाहण्यासाठी थोडा विस्तृत विचार करून खालील म्हणणे मांडले आहे.एकेकाळी कांदा हे महाराष्ट्रातील हुकमी पीक होते. महाराष्ट्र सर्व देशाला कांदा पुरवायचा व निर्यातही करायचा व त्या निर्यातीत महाराष्ट्राचाच मुख्य वाटा होता. पुढे कांदा पिकाला बम्पर लॉटरीचे स्वरूप आले अन् अनेक इतर राज्यांमध्ये कांद्याचे पीक घेतले जाऊ लागले व बाजारपेठेतील महाराष्ट्राची मक्तेदारी संपली. दिल्लीच्या आझादपूर मांडीत आता अनेक राज्यांतून आलेला कांदा खाली होताना पाहायला मिळतो. यामुळे महाराष्ट्राला स्पर्धक तयार झाले हे खरे, पण कांद्याच्या समस्येचे कारण ही स्पर्धा नाही तर सरकारचे धोरण आहे, ज्या धोरणाद्वारे कांदा जीवनावश्यक वस्तूंच्या यादीत समाविष्ट करून असे चित्र निर्माण केले गेले की जर कांद्याचा भाव वाढला की सामान्य जनतेला भाववाढ सोसावी लागेल,

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## अवजड वाहनांना बंदी

**नवी मुंबई** ; सलग सुट्ट्या आणि खारघर येथे होणाऱ्या महाराष्ट्र भुषण सोहळ्यासाठी मुंबई गोवा महामार्गासह, मुंबई पुणे द्रुतगती मार्ग आणि मुंबई पुणे जुना महामार्ग यावर तीन दिवस अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. याबाबतचे शासन आदेश गृह विभागाने जारी केले आहेत.

खारघर येथे जेष्ठ निरुपणकार अप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भुषण पुरस्कार वितरीत केला जाणार आहे. या सोहळ्यासाठी देशभरातून १८ लाख श्री सदस्य दाखल होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर सलग सुट्ट्या आल्याने महामार्गावरील वाहनांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभुमीवर रायगड जिल्ह्यातून जाणाऱ्या तीनही महामार्गांवर अवजड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. १४ एप्रिलला रात्री १२ ते १६ एप्रिल रात्री १२ वाजेपर्यंत ही बंदी लागू राहणार आहे. १६ टन आणि त्यापेक्षा जास्त क्षमतेच्या वाहनांसाठी ही बंदी लागू राहणार आहे. या कालावधीत मल्टी एक्सल व्हेईकल, ट्रेलर, ट्रक आणि रेती आणि खनिज वाहतूक डंपर चालविता येणार

# शेतकरी लॉन्ग मार्च मृत्यू प्रकरणी

# पाच लाखांची मदत!

## मुख्यमंत्र्यांकडून मदतीचा धनादेश सुपूर्द

**। नाशिक ।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**नाशिकहून निघालेल्या शेतकरी लॉन्ग मार्चमधील मृत शेतकऱ्याच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला आहे. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर मदत देण्यात आली आहे. आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मृत शेतकऱ्याच्या कुटुंबियांना पाच लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला आहे.**



आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांची जयंती असून राज्यभरात उत्साहाचे वातावरण आहे. सकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चैत्यभूमी दादर या ठिकाणी भेट देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषद घेत उपस्थित शेतकरी लॉन्ग मार्च मध्ये निधन झालेल्या शेतकऱ्याच्या नातेवाइकांस पाच लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या इतर मागण्यांसंदर्भात सरकार सकारात्मक असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

काही महिन्यापूर्वी नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील लाल वादळ मुंबईच्या दिशेने निघाले होते. शेतकऱ्यांच्या अनेक मागण्यांसाठी हा लॉन्ग मार्च मुंबईला निघाला होता. तब्बल सात दिवसांच्या प्रवासानंतर शेतकरी लॉन्ग मार्च शहापूरपर्यंत पोहचला होता. या ठिकाणी मुख्यमंत्र्यांचे शिष्टमंडळ आणि लॉन्ग मार्चमधील नेतृत्वाची बैठक झाली होती. याच दरम्यान दिंडोरी तालुक्यातील मोहाडी येथील पुंडलिक दादा जाधव या शेतकऱ्याचा मृत्यू झाला होता.

जाधव यांना अस्वस्थ वाटू लागल्याने त्यास रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता. त्याचवेळी मंत्री दादा भुसे यांनी मृताच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत जाहीर केल्याचे सांगितले होते.

### मुख्यमंत्र्यांकडून पाच लाखांचा धनादेश

» दिंडोरी तालुक्यातील मोहाडी येथील शेतकरी पुंडलिक जाधव यांचा वाशिंदमध्ये मृत्यू झाला. 17 मार्च रोजी जाधव त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने मोर्चेकऱ्यांनी त्यांना तातडीने शहापूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी स्वतः या घटनेची माहिती दिली. या मृत्यूनंतर त्यांच्या गावाकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. आमच्या मागण्या अगोदरच मान्य केल्या असत्या आणि त्याची अंमलबजावणी केली असती तर ही वेळ आली नसती अशा भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत. तसेच आमचा शेतकरी बांधवाचा मृत्यू झाला, त्याला शासनाने आर्थिक मदत द्यावी अशी देखील मागणी पुंडलिक जाधव यांच्या गावकऱ्यांनी केली आहे. मृत शेतकऱ्याच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून पाच लाखांची मदत दिली जाईल, अशी माहिती दादा भुसे यांच्यावतीने दिली होती. आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाच लाख रुपये दिले आहेत.

---

## राष्ट्रपती-पंतप्रधान ते सोनिया गांधी-राहुल गांधी, देशातील महत्त्वाच्या नेत्यांकडून

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन!

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती जगभरात मोठ्या उत्साहात साजरी

**। मुंबई ।**
**महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती जगभरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. राजकीय वर्तुळातही वेगवेगळ्या पक्षांच्या नेत्यांनी देशवासीयांनी डॉ. आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. तर दुसरीकडे विरोधी बाकावरील काँग्रेसने नरेंद्र मोदी सकारवर टीका केली.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीटद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. देशातील वंचित, पीडित लोकांना न्याय मिळावा म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांचे संपूर्ण आयुष्य समर्पित केले, असे नरेंद्र मोदी म्हणाले. तसेच डॉ. आंबेडकरांविषयी भाष्य करणारी एक ऑडिओ क्लीप शेअर करत त्यांनी आंबेडकरांना अभिवादन केले. संसदेच्या परिसरात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी एकत्र येत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.द्रौपती मुर्मू यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ज्ञानाचे प्रतिक म्हणून उल्लेख केला. तसेच प्रतिकूल परिस्थिती असूनही त्यांनी शिक्षणतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, राजकारणी, समाजसुधारक म्हणून देशाच्या प्रगतीसाठी काम केले. भारतीयांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि मूल्य आत्मसात करायला हवेत, असे मुर्मू म्हणाल्या.

तर डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने मी सर्व देशवासीयांना शुभेच्छा देतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करतो, अशा भावना ओम बिर्ला यांनी व्यक्त केल्या.

भाजपाचे अध्यक्ष जेपी नड्डा यांनी अन्य सहकाऱ्यांसोबत भाजपाच्या कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण केली. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील वंचित, पीडित लोक, महिला यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. त्यांचे कार्य प्रत्येक भारतीयाला प्रेरित करत राहील, अशा भावना नड्डा यांनी व्यक्त केल्या.

तर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी विरोधकांवर टीका केली. "लोकांना बळजबरीने शांत केले जात आहे. तसेच अँटी नॅशनल ठरवले जात आहे. यामुळे देशाची लोकशाही संपुष्टात येईल. यामुळे संविधान नष्ट होईल. नायक पूजेच्या दुष्परिणामांबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महत्त्वाचे भाष्य केलेले आहे. आपण लोकशाहीच्या ऱ्हासाचे समर्थन केले पाहिजे की संविधानाने घालून दिलेल्या मूल्यांचे रक्षण केले पाहिजे, हे ठरवायला हवे," असे खरगे म्हणाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या मूल्यांची स्थापना केली, त्याच मूल्यांवर आम्ही पुढे जाऊ, अशा भावना राहुल गांधी यांनी व्यक्त केल्या. डॉ. आंबेडकरांची शिकवण आम्हाला दिशा देईल. हीच आमची शक्ती असेल, असे राहुल गांधी म्हणाले.





सोनिया गांधी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दाखला देत देशातली जनतेला एकत्र येण्याचे आवाहन केले. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या इशाऱ्याकडे आपण सर्वांनी गांभीर्याने पाहिले पाहिजे. संविधानाची यशस्वीता ही येथील लोकांवर अवलंबून असेल. राज्यघटनेचे यश ज्या लोकांच्या हाती सत्ता दिलेली आहे, त्यांच्यावर अवलंबून आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते," असे सोनिया गांधी म्हणाल्या. तसेच भाजपा सरकार संविधानाचा गैरवापर करत आहे, असा आरोपही त्यांनी केला.

काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी यांनीदेखील भाजपावर टीका केली. संविधानाच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये देशातील जनतेला शिकायला मिळाली. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आभार. आज संविधानावर, संविधानातील मूल्यांवर ठरवून हल्ला केला जात आहे, असे प्रियांका गांधी म्हणाल्या.

# नागालँड नागरिक हत्याकांड प्रकरण : 30 जवानांवर खटल्यास केंद्राचा नकार!

## कायद्यानुसार याच न्यायालयात 30 जवानांवर आरोपपत्र दाखल

**। कोहिमा । महाईन्यूज ।**

**नागालँडमधील ओटिंग येथे डिसेंबर २०२१ मध्ये १३ नागरिकांचा गोळीबारात मृत्यू झाल्याप्रकरणी लष्कराच्या ३० जवानांविरोधात खटला चालवण्यास केंद्र सरकारने मंजुरी नाकारल्याचे एका अधिकाऱ्याने शुक्रवारी सांगितले. मोन जिल्ह्यात झालेल्या घटनेस जवान जबाबदार असल्याचा आरोप आहे.**

### घटना काय?

**मोन जिल्ह्यातील ओटिंग येथे ४ डिसेंबर २०२१ रोजी सुरक्षा दलाच्या जवानांनी वाहनातून घरी परतणाऱ्या मजुरांवर केवळ संशयातून गोळीबार केला होता. त्यात सहा कामगारांचा मृत्यू झाला होता. या घटनेने संतप्त झालेल्या ग्रामस्थांवरही जवानांनी गोळीबार केला होता आणि त्यात सात जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेच्या चौकशीसाठी नागालँड सरकारने विशेष चौकशी पथक स्थापन केले होते. या पथकाने जवानांवर खटला चालवण्यासाठी केंद्राकडे परवानगी मागितली होती.**

यासंदर्भातील माहिती नागालँड पोलिसांनी मोन जिल्हा आणि सत्र न्यायालयाला दिली. कायद्यानुसार याच न्यायालयात ३० जवानांवर आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सक्षम प्राधिकरणाने (सैन्य व्यवहार विभाग, संरक्षण मंत्रालय) सर्व ३० आरोपींविरोधात खटला चालवण्यास मंजुरी देण्यास नकार दिला आहे, अशी माहिती नागालँड गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलीस महासंचालक रूपा एम. यांनी एका निवेदनाद्वारे दिली. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १९७(२) आणि सशस्त्र दल विशेषाधिकार कायद्याच्या (अफ्सपा-एएफएसपीए) कलम ६ नुसार सुरक्षा दलातील कोणत्याही कर्मचाऱ्याने कर्तव्य बजावताना केलेल्या कोणत्याही कारवाईसाठी त्यांच्याविरुद्ध कायदेशीर खटला चालवण्यासाठी भारत सरकारची मंजुरी अनिवार्य असते. या प्रकरणाबाबत नागालँड पोलिसांनी ३० मे २०२२ रोजी आरोपपत्र दाखल केले होते. लष्कराने या घटनेची चौकशी केली होती, परंतु निष्कर्ष मात्र अद्याप जाहीर केलेले नाहीत.



---

# मद्य विक्री धोरण घोटाळा प्रकरण

# दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची सीबीआय चौकशी होणार

## अरविंद केजरीवाल यांना सीबीआयने चौकशीसाठी समन्स

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सीबीआयने चौकशीसाठी समन्स बजावलं आहे. दिल्ली सरकारने मद्य विक्री धोरणात घेतलेल्या निर्णयात घोटाळा झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणात आधीच दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांना अटक करण्यात आली आहे. त्यानंतर आता केजरीवाल यांनाही समन्स बजावले आहे.**



**त्यामुळे आता दिल्लीतल्या राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे. अरविंद केजरीवाल यांची १६ एप्रिलला चौकशी केली जाणार आहे.**

सीबीआय समन्स आम आदमी पक्षाचे नेते संजय सिंह यांनी ट्वीट करून टीका केली आहे.

### काय आहे नेमकं प्रकरण?


**२०२०-२१ मध्ये दिल्लीतल्या मद्य धोरणात दिल्ली सरकारने बदल केला होता. काही ठराविक कंत्राटदारांनाच त्यात फायदा मिळवून दिल्याचा आरोप आहे. संबंधित योग्य त्या विभागाच्या संमती न घेताच लायसन्स फीमध्ये सवलत दिल्याचाही आरोप आहे. मोठ्या प्रमाणात आर्थिक देणारे निर्णय पक्षपातीपणे घेतल्याचा आरोप केजरीवाल यांच्यावर आहे. या मद्य विक्री धोरणातील घोटाळ्याचा आरोप करत मनिष सिसोदियांना अटक करण्यात आली.**

अत्याचाराचा अंत नक्कीच होणार असल्याचं ट्वीट करत भाजपावर टीका केली आहे. मद्य विक्री धोरण प्रकरणी २६ फेब्रुवारीला मनिष सिसोदियांना अटक झाली आहे. त्यानंतर आप आणि भाजपा यांच्यात आरोपांच्या फैरी झडत आहेत. भ्रष्टाचारविरोधी आंदोलनातून जन्म घेतलेला पक्ष अशी आम आदमी पक्षाची ओळख आहे.

---

# 24 तासांमध्ये 11 हजार नवीन रुग्ण; देशात कोरोना झपाट्याने पसरतोय

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



देशामध्ये कोरोना विषाणूग्रस्त रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. त्यामुळे आरोग्य यंत्रणेसह इतर प्रशासकीय यंत्रणांवर मोठा ताण येत आहे. मागच्या २४ तासांमध्ये तर कोरोनाचा आकडा ११ हजारांच्या पुढे गेलाय.

देशाच्या आरोग्य मंत्रालयाकडून आज देण्यात आलेल्या माहितीनुसार मागच्या २४ तासांमध्ये देशात ११ हजार १०९ नवीन कोरोनाचे रुग्ण आढळून आलेले आहेत. त्यामुळे देशात कोरोनाच्या सक्रीय रुग्णांची संख्या ४९ हजारांच्या पुढे गेलीय.

काल म्हणजे १३ एप्रिल रोजी १० हजार १५८ नवीन रुग्ण आढळून आलेले होते. दिवसेंदिवस कोरोनाचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याचं निदर्शनात येत आहे.

पुढील १० दिवस कोरोना रुग्णसंख्येत अशीच वाढ होणार असल्याचं तज्ज्ञ सांगत आहेत. त्यानंतर कोरोना कमी होईल, असंही सांगितलं जातंय.

देशात ९ एप्रिल रोजी ५ हजार ३५७ कोरोना रुग्ण आढळले होते. १० एप्रिल रोजी ५ हजार ८८० रुग्ण, ११ एप्रिल रोजी ५ हजार ६७६, १२ एप्रिल रोजी ७ हजार ८३० तर १३ एप्रिल रोजी १० हजार १५८ कोरोना रुग्ण आढळले होते.

दररोज हजारांच्या घरात कोरोना रुग्ण आढळून येत असल्याने चिंता व्यक्त होत आहे. सध्या कोरोना ५० हजारांच्या घरात असला तरी तो झपाट्याने वाढत आहे. पुढच्या आठवड्यानंतर रुग्णसंख्या कमी होण्याची शक्यत वर्तवण्यात येतेय. मुंबईमध्ये महानगर पालिका कर्मचाऱ्यांना आणि महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये मास्कसक्ती करण्यात आलीय.

## या तारखेला वेड OTT होतोय रिलिज..

रितेश देशमुख - जिनिलिया देशमुख यांचा वेड सिनेमा प्रचंड गाजला. वेड प्रदर्शित होऊन आता तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ उलटला असला तरीही वेड सगळ्या महाराष्ट्रभरात गाजतोय.

दिवसेंदिवस वेडने कमाईचे नवीन आकडे मोडले. नुकतीच रितेश - जिनिलियाच्या वेड बद्दल एक आनंदाची बातमी समोर आली आहे. ज्यामुळे मराठी प्रेक्षकांना नक्कीच आनंद होईल. अनेकजण वेड OTT वर कधी येतोय याची वाट पाहत होते. अखेर प्रतीक्षा संपली आहे.वेड सिनेमात रितेश - जिनीलीया सोबत अशोक सराफ, विद्याधर जोशी, जिया शंकर अशा कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत. वेड ने सगळ्या महाराष्ट्राला वेड लावलं. वेड OTT वर रिलीज याची सगळेजण वाट पाहत होते.अखेर वेडची OTT रिलीज डेट समोर आलीय. वेड आता २८ एप्रिलला OTT वर रिलीज होतोय. त्यामुळे २८ एप्रिल पासून वेड प्रेक्षकांना घरबसल्या पाहायला मिळणार आहे. वेड कुठे पाहायला मिळणार याचंही उत्तर आम्ही तुम्हाला देतो. वेड Hotstar वर रिलीज होतोय. रितेशने त्याच्या अधिकृत ट्विटर हॅन्डलवरून हि माहिती सर्वांसोबत शेयर केलीय. त्यामुळे प्रेक्षकांना खुप आनंद झालाय. आणखी एक खास गोष्ट म्हणजे वेड मराठी सोबतच हिंदी मध्ये सुद्धा हॉटस्टार वर पाहायला मिळणार आहे.



## अखेर अप्पी कलेक्टर झालीच! पण... असा असेल महाएपिसोड!

झी मराठी वरील "अप्पी आमची कलेक्टर.." या मालिकेत एक मोठा ट्विस्ट आला आहे. आप्पी तिचं कलेक्टर होण्याचं स्वप्न पूर्ण करणार असून नुकतीच ती परीक्षा उत्तीर्ण झाली. अत्यंत हालकीच्या परिस्थितीतून वाट काढत अप्पीने हे यश मिळवलं आहे.

अगदी सासरी गेल्यावर तर तिला अभ्यास करणं ही शक्य नव्हतं पण तिने चिकाटीने हे करून दाखवलं. अगदी शेवटच्या क्षणी तिचे वडील मृत्यूच्या दारात असताना तिला परीक्षेला जावे लागले पण तिने मागे हटली नाही. पण आता मालिका खरी उत्कंठावर्धक वळणावर आली आहे.

आपण ११ आणि १२ एप्रिलच्या भागात पाहिलं अप्पीचा interview जेष्ठ विशेष सरकारी वकील 'उज्वल निकम' आणि लेखक



आणि IAS ऑफिसर 'विश्वास पाटील' यांनी घेतला, या मालिकेच्या निमित्ताने हे दोन ऑफिसर्स टेलीव्हिजनवर प्रथमच मालिकेत खरीखुरी भूमिका साकारताना दिसले.

नुकताच एक प्रोमो समोर आला ज्यामध्ये अप्पी कलेक्टर झाल्याचं दिसणार आहे. येत्या रविवारी महाएपिसोडमध्ये हे आपल्याला पाहायला मिळेल. त्यानिमित्ताने अर्जुन, छकुली, दिप्या आणि सर्व गावकरी मिळून अप्पीची मिरवणूक काढणार आहेत. मोठा सोहळाच गावामध्ये होणार आहे. विशेष म्हणजे ज्यांनी अप्पीला त्रास दिला ते सरकार आणि सुजय देखील तिचे कौतुक करताना दिसणार आहे.

पण हे दिव्य तिच्यासाठी काही सोप्पं नाही. अत्यंत प्रामाणिक असलेली अप्पी कलेक्टर झाल्यावर संसार आणि काम कसं पाहणार हे पाहणे उत्कंठावर्धक ठरणार आहे. शिवाय कायम भ्रष्टाचारावर कडाडणारी अप्पी स्वतःच्या नवऱ्याला भ्रष्टाचार करताना पाहून तिची काय अवस्था होईल, ती त्याला माफ करेल का अशी बरीच आव्हानं अप्पीच्या वाट्याला येणार आहेत.

## सायली संजीव पडली सुषमा अंधारेंच्या प्रेमात.



देखणं रूप, दमदार अभिनय यामुळे कायमच चर्चेत असलेली अभिनेत्री म्हणजे सायली संजीव. सध्या तिचे इतके चित्रपट आले आहेत की नवा सिनेमा येणार म्हणजे त्यात सायली हवीच असे समीकरण झाले आहे.

शिवाय सायलीच्या अभिनयाचे असंख्य चाहते आहेत. सायली सोशल मिडियावरही बरीच सक्रिय असते. ती आपली वैयक्तिक मतं मांडत असते. बऱ्याचदा तिला टिकेला सामोरे जावे लागते पण सायली सगळ्यांना रोखठोक उत्तरं देते.

पण आज मात्र सायली वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे. ते म्हणजे सायली लवकरच राजकीय विश्वात पदार्पण करणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. अशातच तिने शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांचे भरभरून कौतुक केले आहे.सायली सध्या चित्रपटासोबतच राजकारणातही सक्रिय असते. ती महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या चित्रपट सेनेच्या उपाध्यक्ष पदी आहे. पण लवकरच सायली निवडणुकीत उभं राहण्याची पण चिन्हं आहेत.

कारण नुकतच एका मुलाखतीत सायली म्हणाली की, मी जर एखाद्या पक्षात आहे तर त्याच पक्षाचे विचार मी मांडणार. मला जर एखादी गोष्ट इतरांची आवडली तर मी कौतुकही करते. पण पक्षाचे विचार सोडून चालत नाही. शिवाय भविष्यात संधी मिळाली तर मी निवडणूक ही लढवेन. कारण मला समाजाचे काम करायला आवडतेच."

## जय भीम! झी युवावर उलगडणार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवनपट..

दलित समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणणारे, राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे, स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री असलेले, सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभी करणारे, संविधानातील मुलभूत हक्कांचा अधिकार देणारे, बौद्ध धर्माला पुनरूज्जीवन देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट पाहण्याची पर्वणी प्रेक्षकांना नव्याने मिळणार आहे.

विविध विषयांवरील प्रबोधनातून मनोरंजन देणाऱ्या झी युवा या वाहिनीवरून सुरू होत असलेल्या जय भीम... एका महानायकाची गाथा या मालिकेतून डॉ. आंबेडकर यांचे कार्य या मालिकेतून उलगडणार आहे. १४ एप्रिल या डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीदिनी या मालिकेला सुरूवात होत असून महानायकाच्या आयुष्यातील संघर्षापासून ते त्यांनी समाजाच्या परिवर्तनासाठी दिलेल्या योगदानाचा आलेख पाहता येणार आहे.



झी युवा वाहिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महानायकाची गाथा मालिकेच्या रूपातून मांडण्यासाठी सज्ज झाली आहे. जय भीम ... एका महानायकाची गाथा ही मालिका १४ एप्रिलपासून झी युवा वाहिनीवर सोमवार ते शनिवार रात्री ९ वाजता प्रेक्षकांना पाहता येणार आहे.

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर म्हणजेच बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजासाठी मोलाचे कार्य केले आहे. आजपर्यंत डॉ. आंबेडकर यांचे कार्य विविध भाषांमधून मालिका, माहितीपटाच्या माध्यमातून छोट्या पडदयावर दाखवण्यात आले आहे.

यामध्ये झी युवानेही आपले पाऊल टाकले असून महानायक डॉ. आंबेडकर यांच्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यावरील प्रसंग , घटना दाखवणारी ही मालिका उत्सुकतेचा विषय बनली आहे. डॉ. आंबेडकर यांच्या बालपणापासून ते त्यांच्या विद्यार्थीदशेतील घटनांचा वेध घेण्याबरोबरच स्वातंत्र्यसंग्रामातील डॉ. आंबेडकर यांची भूमिका हा या मालिकेचा गाभा आहे.

स्वतंत्र भारताला संविधानाचा पाया देण्यासाठी डॉ. आंबेडकर यांनी केलेला अभ्यास, दलित समाजाच्या उध्दारासाठी घेतलेले कष्ट यावर ही मालिका आधारीत आहे. डॉ. आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याबरोबरच डॉ. आंबेडकर हे व्यक्ती म्हणून कसे होते, त्यांचे कौटुंबिक आयुष्य कसे होते यावरही या मालिकेत प्रकाश टाकण्यात आला आहे.

# दिल्लीविरोधात आरसीबीची ताकद वाढली!

## हुकमी एक्का संघात परतला

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

एम. चिन्नास्वामी स्टेडिअमवर आरसीबी आणि दिल्ली यांच्यामध्ये लढत होणार आहे. दिल्लीचा संघ बेंगलोरमध्ये दाखल झालाय. दोन्ही संघ कसून सराव करत आहेत. दिल्लीला अद्याप एकाही लढतीत विजय मिळवता आलेला नाही. तर दुसरीकडे आरसीबीला तीन सामन्यात एक विजय आणि दोन पराभव मिळाले आहेत. पण आता दिल्लीविरोधात आरसीबीची ताकद आणखी वाढणार आहे..



श्रीलंकेचा आघाडीचा गोलंदाज वनिंदु हसरंगा आरसीबीच्या ताफ्यात दाखल झाला आहे. हसरंगामुळे आरसीबीची ताकद आणखी वाढणार आहे. सुरुवातीच्या तिन्ही सामन्यात आरसीबीची फिरकी गोलंदाजी अतिशय कमकुवत जाणवत होती. पण हसरंगाच्या आगमनामुळे आरसीबीची ताकद वाढणार आहे. दिल्लीविरोधात आरसीबी हसरंगाला प्लेईंग 11 मध्ये संधी देण्याची शक्यता आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु (RCB) आणि दिल्ली कॅपिटल्स (DC) यांच्यात आज बंगळुरु येथे रणसंग्राम पाहायला मिळणार आहे. आरसीबीचा हा चौथा सामना असेल, तर दिल्लीचा हा पाचवा सामना असेल. यंदाच्या मोसमात खेळलेल्या तीन सामन्यांपैकी आरसीबी संघाने एक सामना जिंकला तर दोन सामन्यात त्यांचा पराभव झाला आहे. तर, दुसरीकडे दिल्ली संघाला अद्याप एकाही सामन्यात विजय मिळवता आलेला नाही.

हसरंगाने आयपीएलमध्ये आतापर्यंत दमदार कामिगरी केली आहे. हसरंगाने 18 डावात 7.78 च्या इकॉनॉमीने 26 विकेट घेतल्या आहेत. हसरंगाची फिरकी प्रतिस्पर्धी फलंदाजांना बुचकळ्यात टाकणारी असते. गोलंदाजीशिवाय हसरंगा तळाला फलंदाजीत योगदानही देऊ शकतो. अखेरच्या षटकात मोठे फटकेबाजी मारण्यात हसरंगा पटाईत आहे. हसरंगामुळे आरसीबीची ताकद आणखी वाढणार आहे. दिल्लीविरोधात हसरंगाला प्लेईंग 11 मध्ये स्थान दिले जाऊ शकते.

### गेल्या हंगमात हसरंगाने दमदार प्रदर्शन

श्रीलंकेचा स्टार अष्टपैलू वनिंदु हसरंगा आरसीबीच्या ताफ्यात जोडला गेलाय. न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्यातील मालिकेमुळे हसरंगा सुरुवातीच्या काही सामन्यासाठी उपलब्ध नव्हता. पण आता दिल्लीविरोधातील सामन्यासाठी हसरंगा उपलब्ध असेल. हसरंगाच्या आगमनामुळे आरसीबीचा संघ आधीपेक्षा जास्त मजबूत दिसत आहे. गेल्या हंगमात हसरंगाने दमदार प्रदर्शन केले होते. आरसीबीला त्याने काही सामन्यात विजय मिळवून दिला होता. गोलंदाजीशिवाय हसरंगा तळाला विस्फोटक फलंदाजीही करतो..

# नितीश-रिंकूचे प्रयत्न अपयशी!

## कोलकाता नाईट रायडर्सवर 23 धावांनी रोमांचक विजय

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयपीएलच्या १९व्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सचा सामना सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध कोलकात्याच्या ईडन गार्डन्सवर शुक्रवारी (१४ एप्रिल) पार पडला. या सामन्यात फलंदाजाचा बोलबाला जास्त होता. हैदराबादकडून सलामीवीर हॅरी ब्रुकने आयपीएल२०२३ हंगामातील पहिले शतक झळकावले. त्याच्या शतकाच्या जोरावर हैदराबादने कोलकातासमोर २२९ धावांचे लक्ष्य ठेवले होते. त्याचा पाठलाग करताना रिंकू सिंग, नितीश राणा यांनी धुव्वाधार फलंदाजी करत अर्धशतके झळकावली. मात्र सामना २३ धावांनी गमावली.

धावांचा पाठलाग करताना कोलकाताची सुरुवात खराब झाली. रहमानउल्ला गुरबाजला भोपळाही फोडता आला नाही डावाच्या पहिल्याच चेंडूवर भुवनेश्वर कुमारने त्याला बाद केले. कोलकाता नाईट रायडर्सला त्यांच्या घरच्या मैदानावर ईडन गार्डन्सवर पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्याचा सनरायझर्स हैदराबादने २३ धावांनी पराभव केला. कोलकाताला शेवटच्या षटकात ३२ धावांची गरज होती. रिंकू सिंग आणि शार्दुल ठाकूर क्रीजवर होते. रिंकूने गुजरातविरुद्ध शेवटच्या षटकात २९ धावांचा पाठलाग केला होता, मात्र यावेळी चमत्कार घडला नाही. शेवटच्या षटकाच्या



पहिल्या चेंडूवर उमेश यादव बाद झाला. त्यानंतर केवळ आठ धावा झाल्या. रिंकूने षटकार मारला पण तो पुरेसा नव्हता.

कोलकाताचा कर्णधार नितीश राणाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सनरायझर्सने २० षटकांत ४ बाद २२८ धावा केल्या. प्रत्युत्तरात कोलकाता नाईट रायडर्सला २० षटकांत ७ गडी गमावून २०५ धावाच करता आल्या. रिंकू सिंगने ३१ चेंडूत ५८ धावा केल्यानंतर नाबाद राहिली. त्याने आपल्या खेळीत चार चौकार आणि चार षटकार मारले. कर्णधार नितीश राणाने ४१ चेंडूत ७५ धावांची खेळी केली. एन जगदीशनने २१ चेंडूत ३६ धावा केल्या. शार्दुल ठाकूरने १२ आणि व्यंकटेश अय्यरने १० धावांचे योगदान दिले. आंद्रे रसेल तीन धावा करून बाद झाला तर उमेश यादव एक धाव करून नाबाद राहिला. रहमानउल्ला गुरबाज आणि सुनील नरेन यांना खातेही उघडता आले नाही.

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना सनरायझर्स हैदराबादला हॅरी ब्रूक आणि मयंक अग्रवाल यांनी चांगली सुरुवात केली . मयंक केवळ ९ धावा करून बाद झाला. पण हॅरी ब्रूक वेगाने धावा करताना दिसला, त्याने या आयपीएल हंगामातील पहिले शतक ठोकले. त्यालाच सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला. त्याचा साथीदार राहुल त्रिपाठी ९ धावा करून बाद झाला. यानंतर कर्णधार एडन मार्करामने हॅरी ब्रूकसह तिसऱ्या विकेटसाठी ७२ धावांची भागीदारी केली. एडन मार्कराम ५० धावा करून बाद झाला. ब्रूक आणि अभिषेकने ३३ चेंडूत ७२ धावांची भागीदारी केली. अभिषेक १७ चेंडूत ३२ धावा करून बाद झाला. याविजयासह हैदराबादचे गुणतालिकेत ४ गुण झाले आहेत.